# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. 102 /२०२३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये विद्यापीठ निवड समिती/स्थानिक निवड समितीव्दारे नियुक्त केलेल्या अध्यापकांना मान्यता देण्यासाठी प्रस्ताव प्राप्त होतात. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ या वर्षासाठी विद्यापीठ निवड समिती/स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त केलेल्या अध्यापकांचे निवड समिती अहवाल व शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव शैक्षणिक विभाग मान्यता कक्षाकडे सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

१. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांनी विद्यार्थी संख्येनुसार कार्यभार तपासून घेवून, विहित प्रक्रियेचा अवलंब करून नियमित कायमस्वरूपी अध्यापकीय पदे भरण्याची कार्यवाही करावी व संबंधित अध्यापकांचे शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे, पूर्वीची सर्व मान्यता पत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे निवड समिती झालेल्या दिवशी (on the same day) निवड समिती अहवालासोबत ऑनलाइन पध्दतीने अपलोड करावी व त्याची प्रिंटआऊट घेऊन मूळ निवड समिती अहवालासोबत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांच्या शिक्षक मान्यतेसाठीचा प्रोफॉर्मा बी व त्या संबंधित आवश्यक कागदपत्रांच्या (ऑनलाइन प्रणलीमध्ये अपलोड केलेल्या) छायांकित प्रती त्वरीत शैक्षणिक विभाग मान्यता कक्षाकडे सादर करण्यात यावेत.

२. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करीता स्थानिक निवड समितीद्वारे तदर्थ (Adhoc) स्वरूपात किंवा तासिका तत्वावर अध्यापकांची नेमणूक करण्यासाठी दि. ११/०६/२०२३ ते दि. १५/०९/२०२३ या कालावधीत स्थानिक निवड समितीचे आयोजन करण्यात यावे. तसेच ज्या दिवशी स्थानिक निवड समितीचे आयोजन करण्यात येईल त्याच दिवशी (on the same day) निवड करण्यात आलेल्या अध्यापकांची शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे, पूर्वीची सर्व मान्यता पत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन पध्दतीने अपलोड करण्यात यावी व त्याची प्रिंटआऊट घेऊन सर्व कागदपत्रे मूळ निवड समिती अहवालासोबत दहा दिवसाच्या आत शैक्षणिक विभाग मान्यता कक्षाकडे सादर करण्यात यावेत.

३. शैक्षणिक वर्ष २०२२–२३ किंवा त्यापूर्वी ज्या अध्यापकांना त्याच महाविद्यालयात/परिसंस्थेत शिक्षक मान्यता देण्यात आलेल्या आहेत, फक्त अशा अध्यापकांचे शैक्षणिक वर्ष २०२३–२४ करीताचे मुदतवाढीचे (continuation) प्रस्ताव संस्थेच्या ठरावासह, नेमणूक आदेश, रूजू अहवाल, शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्रे, पूर्वीची सर्व मान्यता पत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन पध्दतीने दि. ११/०६/२०२३ ते दि. ३१/०७/२०२३ पर्यंत अपलोड करण्यात यावीत.

जावक क्र. सीसीओ/ १६२३

दिनांक –०६ जून, २०२३

6/6/2023
( डॉ. मुंजाजी रासवे )
उपकुलसचिव

प्रत :– मा. प्राचार्य /संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था